# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक ०९ मार्च, २०२० / फाल्गुन १९, १९४१ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **गृह मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **महसूल मंत्री** | |
| **(३)** | **पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **कृषि, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६)** | **वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४०**

---

## चिमुर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील उसेगाव उमा नदी पात्रात अवैध वाळु उपसा होत असल्याबाबत

**(१) * २६५० श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमुर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील उसेगाव उमा नदी पात्रात मोठ्या प्रमाणात वाळु उपसा होत असून नागपूर येथील कंत्राटदार मंजुर वाळू घाटा व्यतिरिक्त जवळच्या पात्रातील हजारो ब्रास वाळूचा अवैध उपसा करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी सामाजिक संघटना कडून केल्या गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजुर वाळू घाटाबाबत चौकशी करून संबधीत कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात वाहनांवर ई-चलानद्वारे जारी केलेली दंडाची रक्कम थकीत असल्याबाबत

**(२) * २६३३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ४ वर्षापूर्वी शहरात प्रायोगिक तत्वावर सुरु केलेल्या ई-चलान कारवाईत वाहतूक पोलिसांकडे अचूक व संपूर्ण तपशिलासह माहिती नसल्याने मुंबई शहरातील ४० टक्के वाहनमालक आजही ई-चलान कारवाईच्या क्षेत्राबाहेर असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहन मालकांचा अपूरा तपशिल व निवासी पत्त्याअभावी ४ वर्षापासून ६८ लाख वाहनांवर जारी केलेल्या १.१३ कोटी चलानानुसार २३६ कोटी रुपये दंड अद्यापही वसूल करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची २३६ कोटी रुपयांची थकित दंडाची रक्कम ६८ लाख वाहन मालकांकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच अद्यापपर्यंत किती वाहन मालकांकडून किती रुपये दंड वसूल झाला आहे व किती बाकी आहे,

(४) असल्यास, ई-चलान योजना संपूर्णत: यशस्वी करुन महसूलाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढविण्याकरिता शासनाने विशेष मोहिम राबवून मुंबईतील सर्व वाहन चालक-मालकांची अद्ययावत माहिती संगणकावर अपलोड करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख** : (१), (२) व (३) ऑक्टोबर २०१६ ते डिसेंबर, २०१९ पर्यंत ई-चलानच्या प्रलंबित रक्कमेची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| | भरणा | प्रलंबित | एकूण |
|---|---|---|---|
| चलन संख्या | ४६८५४६३ | ६४१२२२९ | ११०९७६९२ |
| रक्कम | १४९५७४६८७६ | २१७११९०८६४ | ३६६६९३७७४० |

प्रलंबित चलानची रक्कम रु.५,०००/- पेक्षा जास्त झाल्यास किंवा १० पेक्षा जास्त चलान प्रलंबित असल्यास संबंधित वाहन चालकांचे वाहन पोर्टलद्वारे पत्ते प्राप्त करुन त्यांना नोटीसा पाठविण्यात आल्या आहेत. नाकाबंदीच्या दरम्यान तपासल्या जाणाऱ्या वाहनांवर दंडणीय रक्कम प्रलंबित असल्यास ती डेबीट अथवा क्रेडीट कार्ड द्वारे वसूल केली जाते. तसेच दंडाची रक्कम भरण्याकरीता डीजीटल पेमेंटची सेवा उदा. पेटीएम, नेट बँकींग, जिओ पे इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. एखाद्या वाहनावर टोईंग कारवाई करुन चौकीत आणल्यावर प्रलंबित चलानची रक्कम वसूल केल्यानंतरच सदरचे वाहन मालकाच्या स्वाधीन करण्यात येते.

परिवहन विभागाच्या https://vahan.nic.in पोर्टलद्वारे सर्व वाहनांची व वाहनांच्या मालकांची अद्ययावत माहिती वेळोवेळी प्राप्त करण्यात येते. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांच्या मालकांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस. च्या स्वरुपात ई-चलान पाठविण्यात येते.
(४) ई-चलान कार्य प्रणालीमध्ये मुंबई शहरातील वाहन चालक/मालकांची अद्ययावत माहिती अपलोड करण्यासाठी mumtrafficapp हे ॲप उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच वाहतूक पोलीस अंमलदार यांचेकडून वाहन चालक/मालक यांचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक ई-चलान उपकरणाद्वारे अद्ययावत केले जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यात गावठाण जमिनीवरील शर्तभंग प्रकरणी काढलेल्या नोटीसांबाबत

**(३) * ७३६० श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात गावठाण विस्तार योजनेअंतर्गत ज्या नागरीकांना भूखंड वाटप करण्यात आले आहेत अशा भूखंड धारकांवर महसूल विभागाने शर्तभंग नोटीस काढल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील ज्या भूखंड धारकांवर शर्तभंग नोटीस काढण्यात आल्या आहेत त्यांना शासकीय दरपत्रकानुसार सुट देवून भूखंड नावे करण्याबाबतची बैठक तत्कालीन महसूल, राज्यमंत्री यांचे अध्यक्षेतेखाली घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी, भूदरगड व आजरा तालुक्यातील ग्रामपंचायत हद्दीअंतर्गत असलेल्या गावठाण जमीनीवरील शर्तभंग प्रकरणी प्लॉट धारकांना देण्यात आलेल्या नोटीसांच्या अनुषंगाने दि. २८.१.२०१९ रोजी तत्कालीन राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये तत्कालीन राज्यमंत्री (महसूल) यांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी उचित कार्यवाही करण्याचे संकल्पीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खंडाळा (ता.मावळ, जि.पुणे) येथे अवैध गौण खनिज उत्खनन केल्याबाबत

**(४) * ६८८४ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खंडाळा (ता.मावळ, जि.पुणे) येथील सर्वे क्रमांक ४१ व ४२ मधील प्लॉट क्रमांक ९, ११ व १२ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खंडाळा विभागातील टेकड्यांवर एका नामवंत कंपनीने महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने बेकायदेशीररित्या गौण खनिज उत्खनन केले असून या कंपनीला दंडात्मक नोटीस पाठवण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४८/७ नुसार बेकायदा गौण खनिज उत्खनन करणाऱ्या कंपनीवर तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) मौजे खंडाळा, ता.मावळ येथील सर्वे क्र.४१ व ४२ मधील प्लॉट क्र.९, ११ व १२ या ठिकाणाहून एकूण ५८०४ ब्रास गौण खनिजाचे अनधिकृत उत्खनन झाल्याचे निदर्शनास आल्याने संबंधिताना तहसिलदार, मावळ यांनी दि.२८/०१/२०२० रोजी अनधिकृत उत्खननाबाबत सुनावणीची नोटीस बजावली असून महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४८ (७) नुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील जेट्टी परिसरात मच्छिमार व्यवसायासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(५) * ५५० श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई परिसरातील ऐरोली, दिवा, गोठवली, तळवली, घणसोली, वाशी, करावे व बेलापूर या गावांत मच्छिमार व्यवसाय मोठ्या प्रमाणावर होत असुन मासळी साठवणूक, वाहतुक व मासळी सुकविण्याची कोणतीही व्यवस्था त्या ठिकाणी नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त व्यवसायासाठी जेट्टी परिसरात ओटले बांधणे, शीतगृहे, जाळे विणण्यासाठी शेड, होड्यांसाठी उतरता धक्का, प्रसाधन गृहे, सौरऊर्जा दिवे इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदने माहे जानेवारी-ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान शासनास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे खरे नाही.

(२) श्री.संदिप नाईक, तत्कालीन विधानसभा सदस्य यांनी दि.२७/१२/२०१६ रोजी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले होते.

(३) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मौजे घणसोली, वाशी व दिवा येथील मासळी उतरविण्याच्या केंद्रावर मच्छिमारांना विविध मुलभुत सुविधा पुरविण्याची रु.२२४.०३ लक्ष किमतीची १६ बांधकामे करण्यात आली आहेत. तसेच नाबार्ड अर्थसहाय्यीत योजने अंतर्गत दिवाळेगाव, बेलापूर येथील रु.१०.२० कोटी रकमेचे काम मंजूर असून, या कामाचे कार्यारंभ आदेश दि.३१.०७.२०१८ रोजी देण्यात आले असून, मा. उच्च न्यायालयामार्फत सागरी तटीय नियमन क्षेत्राचे (सीआरझेड) ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त होताच सदरचे काम सुरु होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तलासरी (जि.पालघर) तालुक्यात अनधिकृत उत्खनन होत असल्याबाबत

**(६) * १६८१ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यात भू-सुरुंग स्फोटाद्वारे दगडखाणीतून अनधिकृतपणे दगड काढण्यात येत असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भू-सुरुंग स्फोटाद्वारे दगडखाणीतून अनधिकृतपणे दगड काढणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) तलासरी (जि.पालघर) तालुक्यात सुरुंग स्फोटाद्वारे दगडखाणीतून अनधिकृतपणे दगड उत्खनन होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणातील आंबा कलमावरील फुलोऱ्यावर लष्करी अळी व तत्सम कीडीचा झालेला प्रादुर्भाव

**(७) * १८१७ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामधील ढगाळ वातावरणामुळे कोकणातील आंबा कलमावरील फुलोऱ्यावर लष्करी अळी अथवा तत्सम कीडीचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंबा कलमांची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार लष्करी अळी अथवा तत्सम कीडीचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशतः खरे आहे.

आंबा फुलो-यावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळुन आलेला नसुन रत्नागिरी जिल्हयामध्ये उंट अळीचा प्रादुर्भाव आढळुन आला. परंतु हे प्रमाण अत्यंत नगण्य असून रत्नागिरी तालुक्यातील पावस परिसरामध्ये १५ ते १६ हेक्टर आंबा प्रक्षेत्रावर विखुरलेल्या स्वरुपात उंट अळींचा प्रादुर्भाव आढळून आला.

(२) होय.

कृषि विभागाचे अधिकारी व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विदयापीठाचे शास्त्रज्ञ यांच्या संयुक्त पथकामार्फत प्रादुर्भावग्रस्त क्षेत्राची पहाणी करण्यात आली आहे.

(३) आंबा बागायतदारांना किड रोग व्यवस्थापन संदर्भात तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले आहे.

रत्नागिरी तालुक्यातील पावस परिसरामध्ये शेतकऱ्यांना क्विनॉलफॉस २ मि.ली प्रति लिटर पाण्यात मिसळुन २ फवारण्या करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात चित्रपटांची ऑनलाईन तिकीट विक्री करतांना अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत

**(८) * ३३६८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चित्रपटांची ऑनलाईन तिकीटे विक्री करताना त्यावर कोणतेही सेवा किंवा अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये याबाबत शासनाने दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ रोजी तसेच दिनांक १८ मार्च, २०१४ रोजी शासन निर्णय काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चित्रपट पाहण्यासाठी बहुतांश प्रेक्षक ऑनलाईन बुकिंगला प्राधान्य देत असुन हे बुकींग करण्यासाठी वेगवेगळ्या ॲपचा वापर केला जातो तथापि या ॲपवरुन तिकीट बुक केल्यास ग्राहकाला मूळ तिकीट दराच्या १० टक्के जादा रक्कम इंटरनेट हँडलिंग फीच्या नावाखाली मूळ तिकीटावर आकारुन राज्य शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन करुन प्रेक्षकांची करोडो रुपयांची फसवणूक होत असल्याची बाब ग्राहक पंचायतीच्या सदस्यांनी माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार प्रेक्षकांकडून अतिरिक्त शुल्क वसूल करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे. दि.१८.३.२०१४ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे.

अ) ग्रामपंचायत व अ, ब, व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील एक पडदा चित्रपटगृहांना करमणूक शुल्क माफी तसेच राज्यातील सर्व चित्रपटगृहांना अतिरिक्त सेवा शुल्क आकारणीच्या अंमलबजावणी संदर्भात शासन निर्णय क्रं, ईएनटी-२०१३/प्र.क्र.३३/टी-१, दि.२८.२.२०१३ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.

ब) राज्यातील सर्व चित्रपटगृह चालकांनी ऑनलाईन तिकीट विक्री यंत्रणा उपलब्ध करुन देणेबाबत शासन परिपत्रक क्र. ईएनटी-२०१३/प्र.क्र.९१/टी-१, दि.१८.३.२०१४ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) ग्राहक पंचायतीचे अतिरिक्त शुल्क आकरणीबाबतचे निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही.

तथापि, महाराष्ट्र अधिनियम क्र.४२, दि. २९ डिसेंबर, २०१४ अन्वये मालक/सेवापुरवठादार यांना ऑनलाईन तिकीट आरक्षण सुविधा पुरविण्यासाठी प्रति तिकीट रु. १०/- इतके शुल्क आकारता येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथे शिक्षिकेला जिवंत जाळल्याबाबत

**(९) * ६६९८ श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (ता.हिंगणघाट, जि.वर्धा) येथे एका शिक्षिकेला एकतर्फी प्रेमातून पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली असून या हल्ल्यात पिडीत युवती ४० टक्के भाजली असून तिच्यावर नागपूरमधील ऑरेंज सिटी रुग्णालयात उपचार सुरू होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंधारी (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) या गावातही एका महिलेच्या घरात शिरून तिला पेटवून दिल्याचे तसेच मिरारोड येथे बलात्काराचा गुन्हा मागे न घेणाऱ्या एका महिलेवर ज्वलनशील द्रव्य

फेकल्याची घटना दिनांक ५ फेब्रुवारी, २०२० रोजी घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांताक्रुझ (मुंबई) पूर्वेकडील वाकोला येथील एका चाळीत एका तरुणीवर बलात्कार करून खून केल्याचे व पनवेलमधील दुदरे येथील ५५ वर्षीय महिलेची हत्या करून तिला फासावर लटकवल्याचे तसेच माटुंगा रेल्वे स्थानकावर एका महिलेचा विनयभंग करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होवू नये व महिलांच्या सुरक्षिततेसाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) या सर्व प्रकरणातील आरोपींवर गुन्हा दाखल करून सदरहू घटनेतील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत तपास चालू आहे.

राज्यातील महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

• महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी, महिला अत्याचार प्रतिबंधक विभागाची स्थापना करण्यात आली असून विशेष पोलीस महानिरीक्षक हे विभागाचे प्रमुख आहेत.

• महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरीता राज्यात २७ विशेष न्यायालये व २५ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

• पोलीस आयुक्तालये/जिल्हयांमध्ये महिला सुरक्षा समित्या व महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

• बलात्कारासारख्या गंभीर गुन्हयांचा तपासाची कार्यपध्दती बाबतच्या मार्गदर्शक सुचना सर्व पोलीस घटकांना वितरीत केलेल्या आहेत.

• छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी पायी पेट्रोलिंग,शाळा कॉलेजच्या परिसरात प्रतिबंधात्मक उपाययोजना, नाकाबंदी, महिला सुरक्षा व छेडछाड पथके तयार करण्यात आली आहेत.

• महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे तपासासाठी आणि त्यांचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरावर दि.१२/१०/२०१७ च्या शासन निर्णयानुसार विशेष पथके गठीत करण्याचा निर्णय घेतला आहे.

• राज्यात, मुंबईसह पुणे शहर, ठाणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामिण, यवतमाळ, अहमदनगर येथे Investigation Units for Crime Against Women (IUCAW) स्थापन केली आहेत.

• मुंबई, ठाणे व नवी मुंबई क्षेत्रातील संकटातील महिलांच्या मदतीकरिता टोल फ्रि हेल्पलाईन क्र. “१०३” व उर्वरित क्षेत्राकरिता “१०९१” सुरु करण्यात आली आहे. रेल्वे पोलीस घटक, मुंबई व पुणे ९८३३३३११११, नागपुर ०७१२-२७४३९८४ व बहन्मुबई पोलीस घटकात २४ तास कार्यरत असणारी हेल्पलाईन सेवा कार्यरत आहे. याशिवाय www.mumbaipolice.org व comcell.mum.crime@mahapolice.gov.in या वेबसाईटवर online तक्रार करता येते.

• संकटग्रस्त महिला व मुलींच्या सुरक्षिततेकरिता (अकोला, बीड, उस्मानाबाद, परभणी, नागपूर ग्रामीण, वर्धा, अहमदनगर, रत्नागिरी, ठाणे ग्रामिण, नागपूर शहर, ठाणे शहर, औरंगाबाद शहर, सोलापूर शहर, नवी मुंबई व अमरावती शहर) नमूद घटकांनी मोबाईल ॲप सुरु करण्यात आले आहे.

• महिलांवरील अत्याचारांच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आंध्रप्रदेश राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही नवीन कायदा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवाजी नगर (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) येथे महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या युवतीचा झालेला मृत्यू

**(१०) * ३०२७ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कु.वैष्णवी राजू गुजर रा.शिवाजी नगर, मलकापूर (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) या दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजीपासून बेपत्ता असलेल्या युवतीचा मृतदेह दिनांक १८ जानेवारी, २०२० रोजी मध्य प्रदेशातील नेपानगर येथे आढळून आल्याची बाब दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कु.वैष्णवी ही बेपत्ता झाल्याची तक्रार तिच्या कुटुंबियांच्यावतीने दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शहर पोलीस स्टेशन, मलकापुर येथे केली असताना पोलिस निरीक्षक यांच्याकडून तपासकार्यात झालेल्या हलगर्जीपणामुळे तरुणीचा मृत्यू झाल्याने स्थानिक नागरिकांनी दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी शहर पोलीस स्टेशन, मलकापूर येथील पोलीस उप निरीक्षकाविरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये मोर्चा नेला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करून तपासकार्यात हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित पोलीस निरीक्षकावर कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.गृहमंत्री यांना दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व वैष्णवीच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर तथा तपास कार्यात हलगर्जीपणा करणाऱ्या पोलीस निरीक्षकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) होय,

दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी फिर्यादी यांनी त्यांची पुतणी कॉलेजला जात असतांना अज्ञात व्यक्तीने अपहरण केले म्हणून अप.नंबर २५/२०२० कलम ३६३ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी नेपानगर येथील बेपत्ता मुलीचे प्रेत असल्याचे समजुन आल्याने सोशल मिडीयावर घातपाताचा सशंय व्यक्त केल्याबाबत मेसेज व्हायरल झाले होते. त्यामुळे जनभावना प्रक्षोभक होवुन शिवाजी नगर भागातील नागरिकांसमवेत माजी आमदार श्री.चैनसुख संचेती व मुलीचे समाजाचे लोकांनी मुलीचे मृतदेहासह पोलीस स्टेशन मलकापूर शहर येथे मोर्चा नेला होता.

बेपत्ता मुलीचा मृत्यू घातपाताने झाल्याचे आतापावेतोच्या तपासात निष्पन्न झालेले नाही. पोलीस तपासात दिनांक १३ जानेवारी, २०२० रोजी प्रकरण दाखल झाल्यापासून सदर मुलीचे शोधासाठी पोलीसांकडून सर्वतोपरी व अथक प्रयत्न करण्यात आलेले आहेत. या गुन्हयाचे तपासात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा, निष्काळजीपणा केलेला नाही.

(३) खाटीक समाज बांधव, नागपूर यांच्या वतीने दिनांक २४/०१/२०२० रोजी मा.गृहमंत्री यांना बेपत्ता मुलीच्या मृत्यूची चौकशी सी. बी. आय. मार्फत करण्यात यावी व तीच्या कुटूंबियांना आर्थिक मदत मिळावी व सदर प्रकरणी जातीने लक्ष घालावे अन्यथा समाजातर्फे रस्त्यावर उतरुन पोलीस व शासनाविरुध्द आंदोलन करण्यात येईल असे निवेदन देण्यात आलेले आहे.

(४) सदर निवेदनातील मुद्यांबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी, मलकापूर यांनी सदर प्रकरणी झालेल्या तपासाबाबत पडताळणी व खात्रीकरुन आतापर्यंत झालेल्या तपासादरम्यान पोलीसांचा तपासामध्ये हलगर्जीपणा दिसून येत नाही असा अहवाल दिलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भातकुली व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात रेती तस्करी होत असल्याबाबत

**(११) * ३८०० श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे वाळू घाट लिलाव प्रक्रिया रखडल्याने नदीपात्रातून दररोज मध्यरात्री अवैध रेतीची तस्करी सुरु असल्याचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असून नंबरप्लेट नसलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली, मिनीडोरदवारे शेकडो ब्रास रेतीची तस्करी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर रेती माफीयांवर कारवाई करण्याबाबत तसेच वाळू घाट लिलाव प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१), (२) व (३) भातकुली व चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात दि. ३० नोव्हेंबर,२०१९ रोजी वा त्यासुमारास वाळूची तस्करी तसेच विना नंबरप्लेट वाहनांद्वारे वाळूची तस्करी होत असल्याची बाब निदर्शनास आली हे अंशत: खरे आहे.

भातकुली व चांदूरबाजार तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्याकरीता भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत भातकुली तालुक्यात माहे एप्रिल,२०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या ५ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.२,४४,०००/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

तसेच चांदूरबाजार तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २२ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रु.९,४६,८८०/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात रेतीचे अवैध उत्खनन करून साठा केल्याबाबत

**(१२) * ३०८३ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात कंत्राटदार मोठ्या प्रमाणावर शासन नियमांचा आधार घेत क्षमतेपेक्षा जास्त रेतीचा नदीतून उपसा करून साठवणूक करत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा नियमाप्रमाणे रेतीच्या जेवढ्या ब्रास मंजूर करून दिल्या जातात त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक ब्रास रेतीचा साठा ठेवला जात असून साठा केलेल्या रेतीतून दररोज तेवढीच रेती बाहेर विक्रीला गेल्यानंतरही तेवढाच साठा कायम राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वारंवार तक्रारी व सूचना करूनही संबंधित अधिकारी कंत्राटदारांवर कोणतीही कारवाई करीत नसल्याने त्यांचे आर्थिक हितसंबंध असल्याचा निष्कर्ष निघत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रेतीचा साठा करून ठेवणाऱ्या कंत्राटदारांवर व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) गडचिरोली जिल्हयात सन २०१८-१९ या वर्षामध्ये एकूण ३१ वाळूघाट सर्वोच्च बोलीने लिलावात गेलेले होते. सदर वाळूघाटांची मुदत माहे ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत होती. मुदत संपल्यानंतर सदर वाळूघाटाचे ताबे संबंधित तहसिलदार यांचे मार्फत परत घेण्यात आले आहेत. वाळूघाटांची मुदत संपल्यानंतर ३१ वाळूघाटधारकांपैकी २० वाळूघाटधारकांनी त्यांच्याकडे शिल्लक असलेला वाळूसाठा विक्री करण्यासाठी गौण खनिज विक्रेता लायसन्सकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज दाखल केले होते. सदर २० वाळूघाटधारकांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार दि.३१/१२/२०१९ या कालावधीपर्यंत वाळूसाठा व विक्री करण्याकरीता परवाने मंजूर करण्यात आले होते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात हिरा ग्रुप कंपनीकडून गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याबाबत

**(१३) * २०८४ श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात हैद्राबाद येथील हिरा ग्रुप ऑफ कंपनीने गुंतवणूकदारांना केलेल्या गुंतवणुकीचा परतवा न दिल्याने हजारो गुंतवणूकदारांची लाखो रुपयांनी फसवणूक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेख नईम शेख अब्दुल रहीम रा. सागवान (ता.जि.बुलढाणा) यांनी बुलढाणा शहर पोलीस स्टेशनकडे दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास फिर्याद दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये फिर्यादीसह २५ ठेवीदारांची एकूण रुपये ८५,५०,०००/- ची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) व (३) फिर्यादी यांनी दिनांक २५/१०/२०१८ रोजी बुलढाणा शहर पोलीस स्टेशन येथे केलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे आरोपीविरुध्द अप.क्र. १०७८/१८ कलम ४२०, ३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयातील तक्रारदारांचे जबाब घेणे सुरु असून आरोपीच्या मालमत्तेचा शोध घेणे सुरु आहे. तसेच एक आरोपी अटक असून इतर आरोपीचे अटकेबाबत प्रक्रिया सुरु आहे. आरोपितांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कृषी मित्र योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(१४) * ७१६३ श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभागाच्या योजना, अनुदाने, बी-बियाणे औषधे, पशुधन या विषयांवरिल माहिती, त्याचे साहित्य, कृषी खात्याची प्रकाशने याची माहिती शेतकऱ्यांना देण्यासाठी गावपातळीवर ग्रामसभेमार्फत कृषी मित्र यांची दरवर्षी नेमणूक करण्याची योजना शासनाने अंमलात आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सध्या २२ हजारापेक्षा जास्त कृषी मित्रांची संख्या असून दरवर्षी सुमारे २६ कोटी ४० लक्ष रुपये निधी त्यांचेवर खर्च होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कृषी मित्रांना सुरुवातीच्या काळात प्रतिमाह रुपये ५००/- इतके मानधन दिले जात असतांना तत्कालीन शासनाने हे मानधन वाढवून रुपये १०००/- इतके केले, मात्र त्यानंतर कृषी मित्रांनी शेतकऱ्यांना व कृषी सहाय्यकांना कोणतीही माहिती व प्रकाशन पुस्तक दिले नसल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी मित्र योजनेची अंमलबजावणी योग्य प्रकारे करुन शेतकऱ्यांना व कृषी सहाय्यकांना उक्त विषयांसंदर्भात माहिती व प्रकाशन पुस्तके देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(आत्मा) अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार शेतकरी मित्राची निवड ही ग्रामपंचायतीच्या ठरावानुसार दोन महसुल गांवाकरीता १ शेतकरी मित्राची निवड करण्यात येते.

(२) हे खरे नाही, तथापि राज्यात सद्यस्थितीमध्ये १६७२४ शेतकरी मित्र निवडले आहेत. सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये शेतकरी मित्रांवर माहे जानेवारी, २०२० अखेर रक्कम रु.२.९९ रक्कम कोटी खर्च झालेला आहे.

(३) आत्मा ही योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे शेतकरी मित्र ही बाब केंद्र : राज्य (५०:५०) या प्रमाणात राबविण्यात येत असुन केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना - २०१८ अन्वये निवड करण्यात आलेल्या शेतकरी मित्रांना योजनांच्या प्रचार प्रसिध्दी करीता शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देण्याकरीता होणारा प्रवास व इतर शेतकऱ्यांशी दुरध्वनीद्वारे/भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करणेकरीता होणारा खर्च, त्यांना आवश्यक असलेली शेती विषयक पुस्तके, मासिक खरेदी करणे, कृषि व कृषि संलग्न विभागांर्तगत विविध योजनांची माहिती घेणेकरीता संबंधीत कार्यालयास संपर्क करणे याकरीता त्यांना येणाऱ्याखर्चाची प्रतिपुर्ती म्हणुन प्रती महिना रक्कम रु. १०००/- देय आहेत. तसेच दि. २४/१/२०२० अथवा त्या दरम्यान शेतकरी मित्रांकडून कोणतीही प्रकाशने किंवा पुस्तके देण्याबाबत मागणी/निवेदन प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वाळू लिलाव रखडल्याबाबत

**(१५) * ३०८२ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वाळूचे दर निश्चित न झाल्याने गतवर्षी वाळू लिलाव रखडले असतांना यावर्षी वाळूचे दर वेळेत निश्चित होऊन पर्यावरणाचा दाखला घेण्याबाबतच्या नव्या निकषामुळे वाळू लिलाव रखडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळूचा लिलाव वेळेत न झाल्यास शासनाचे १५ कोटी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होऊन जिल्ह्यातील बांधकामेही ठप्प होणार आहे तसेच बेकायदेशीर वाळू उत्खनन व विक्रीचे प्रकार वाढत असल्याने वाळू

लिलावासाठी आवश्यक असलेला पर्यावरणाचा दाखला मिळण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) तसेच पर्यावरणाचा दाखला मिळण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) पर्यावरण विभागाच्या दि.३/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये हातपाटीसाठी (० ते ५ हेक्टरपर्यंत क्षेत्रासाठी) पर्यावरण अनुमती घेण्याचे अनिवार्य केले होते. तथापि, आता पर्यावरण विभागाने त्यांच्या दि.२९/१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रातील हातपाटीद्वारे स्थानिक पारंपारिक तटीय क्षेत्रातील लोकांसाठी वाळू उपसा करण्याकरीता EIA Notification, २००६ अंतर्गत स्वतंत्रपणे पूर्व पर्यावरण अनुमती घेण्याचे नमूद करण्यात आले नसल्याचे कळविले आहे.

दि.२१/५/२०१५ रोजीच्या वाळू/रेती निर्गती धोरणानुसार डुबी/ हातपाटीद्वारे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्यांना वाळू उत्खननासाठी परवाने देण्याच्या अनुषंगाने सन २०१९-२० या वर्षाकरीता सिंधुदूर्ग जिल्हयात स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि.२९/१/२०२० रोजी जाहिरात प्रसिध्द करुन दि.५/२/२०२० पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार ४ परिपूर्ण अर्ज प्राप्त झाले आहेत. तहसिलदार, मालवण यांना स्थळपाहणी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले असता, स्थळपाहणी अहवाल दि.२४/०२/२०२० रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांच्याकडे प्राप्त झाला आहे. त्यानुसार वाळू परवाने निर्गमित करण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.

-----------------

## दापचरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथे मुंबई व उपनगरातील गुरांचे तबेले स्थलांतरीत करण्याबाबत

**(१६) * ६०५१ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व उपनगरातील विविध भागात असलेले ३६ हजार गाई म्हशींचे गोठे-तबेले डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दापचरी येथे स्थलांतरीत

करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने शासनाला दिले असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निर्णय हा सन २००७ मध्येच झाला असल्याचे तत्कालीन शासनाने न्यायालयाला सांगून देखील प्रत्यक्षात सदर तबेले हे स्थलांतरीत झाले नसल्यामुळे न्यायालयाने गंभीर दखल घेत पुढील सहा आठवडयात दापचरी प्रकल्पाच्या कामांना मंजुरी देऊन तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन किती टप्प्यात मुंबईतील गुरे दापचारी येथे स्थलांतरीत करणार असून इतर कोणत्या ठिकाणी त्यांना हलविण्यात येणार आहे याची व्यवस्था करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१), (२) व (३) होय, मा.उच्च न्यायालयाने मुंबई व मुंबई उपनगरे तसेच कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर व ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील गुरांचे तबेले दापचरी येथे स्थलांतरित करण्याबाबत दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी आदेश दिले आहेत.

दापचरी येथे गुरांचे तबेले स्थलांतरित करण्याबाबतचा कृती आराखडा शासनाने सन २००८ मध्ये मा.उच्च न्यायालयास सादर केला होता.

याप्रकरणी दिनांक ९ डिसेंबर, २०१९ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम निर्देशानुसार, प्रधान सचिव (पदुम) तसेच अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेऊन निश्चित झालेल्या आराखड्याच्या अनुषंगाने मा.न्यायालयाच्या उक्त दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजीच्या आदेशानुसार पुढील ५ वर्षात प्रथमत: मुंबई व मुंबई उपनगरे येथील गुरांचे तबेले स्थलांतरित केले जाणार असून, दुसऱ्या टप्प्यात कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर व ठाणे महानगरपालिका अंतर्गत असलेले गुरांचे तबेले दापचरी येथे स्थलांतरित करण्यात येणार आहेत.

स्थलांतरित होणाऱ्या गुरांच्या तबेल्यांसाठी दापचरी येथे १४० हे.आर. इतकी जमीन चिन्हांकित केली असून, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन योजनेचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(१७) * २१०९ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन योजना सन २०१३-१४ व शेतावरील पाणी व्यवस्थापन उपअभियानांतर्गत सन २०१४-१५ मधील ठिबक सिंचनाचे अनुदान अद्यापपर्यंत मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ठिबक सिंचन योजनेंतर्गत सन २०१३-१४ या वर्षासाठी १३५ लाख व सन २०१४-१५ या वर्षासाठी १६७ लाख इतक्या रकमेचे अनुदान प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांनी सफल फायनान्स यांचेकडून कर्ज काढून शेतामध्ये ठिंबक सिंचन योजना राबविली असल्याचे लेखी निवेदनाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले असुनही शेतकऱ्यांना अनुदान न मिळाल्यामुळे शेतकरी सफल फायनान्सचे कर्जाचे हप्ते भरु शकले नसल्यामुळे त्यांचेवर सफल फायनान्सने गुन्हे दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांनी सदर प्रकरण जिल्हाधिकारी, जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, संचालक (फलोत्पादन) कृषी आयुक्तालय, पुणे इत्यादींच्या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचन योजनेंतर्गतचे सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षासाठीचे प्रलंबित अनुदान तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) व (२) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड यांच्या मागणीनुसार सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षातील प्रलंबित प्रकरणांसाठी अनुक्रमे रु.१.२४ कोटी व रु. ७.४३ कोटी निधी मार्च २०१६-१७ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर निधीचे वाटप शेतकऱ्यांना

करण्यात आले आहे. तथापि सन २०१३-१४ या वर्षातील १०८ शेतकऱ्यांचे रु.३१.०४ लक्ष व सन २०१४-१५ या वर्षातील ४२२ शेतकऱ्यांचे रु.१३४.१५ लक्ष असे एकूण ५३० शेतकऱ्यांचे रु.१६५.१९ लक्ष अनुदान प्रलंबित असल्याबाबत शेतकऱ्यांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

(३) नाही.

(४) व (५) शेतकऱ्यांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत निवेदन प्राप्त झाले असून सदर प्रलंबित प्रकरणांची तपासणी करुन आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुक सुरू असल्याबाबत

**(१८) * ४८६५ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (उर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुक सुरू असून त्यामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यातील रेती घाट लिलाव झाले नसतानाही अवैध गौण खनिजाची वाहतूक होत असून यावर महसूल विभागाकडून कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अवैध गौण खनिज वाहतुक करणाऱ्यांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीला प्रतिबंध घालण्यासाठी तालुकास्तरीय भरारी पथके स्थापन करण्यात आली असून सदर पथकामार्फत तेल्हारा तालुक्यात माहे एप्रिल, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या ३ प्रकरणी दंडात्मक कारवाई करून रू.४,६३,३३२/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच एका प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्तकनगर (जि.ठाणे) येथील रेप्टाक्रॉस कंपनीच्या मागील परिसरामध्ये पोलीस उपनिरिक्षकाने आत्महत्या केल्याबाबत

**(१९) * १२८ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्तकनगर (जि.ठाणे) येथील रेप्टाक्रॉस कंपनीच्या मागील परिसरात मोठ्या प्रमाणात झाडा-झुडपांसह अस्वच्छता पसरली असून कंपनीमार्फत या जागेची साफसफाई केली नसल्याने दुर्गंधी पसरली असून मागील प्रवेशद्‌वारावर सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली नसल्यामुळे या निर्जन परिसरात अनेक गैरकृत्य घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निर्जन परिसरात सुरक्षारक्षक नसल्यामुळे दिनांक २९ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मुंबई रेल्वे सेवेतील एका पोलीस उपनिरिक्षकाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन या परिसराची स्वच्छता करण्याबाबत तसेच अवैध व्यक्तींना प्रवेश मिळू नये व गैरकृत्य होऊ नये

यासाठी कंपनीच्या मागील परिसरातील प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) वर्तकनगर (जि. ठाणे) येथील बंद रेप्टाक्रॉस कंपनीच्या कंपाऊंडच्या आतिल परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढलेली आहेत. कंपनीकडून त्याची स्वच्छता करण्यात आलेली नाही. परंतु, कंपनीमार्फत दिवसा व रात्री सुरक्षा रक्षक नियुक्त केलेले आहेत.
(२) रेप्टाक्रॉस कंपनीचा परिसर मोठ्या स्वरुपात असून एकच मेन गेट असून त्याठिकाणी एस.एस.आय.सिक्युरिटी कंपनीचे ३ सुरक्षा रक्षक दिवसा व ३ रात्री या प्रमाणे कायमस्वरुपी नेमलेले असून त्यांना सदर परिसरात २-२ तासाने पेट्रोलिंग करण्याच्या सूचना देण्यात आल्याने सदर सुरक्षारक्षक परिसर पेट्रोलिंग करुन गेटवर बसत असतात. पोलीस उपनिरीक्षक यांनी सुरक्षा रक्षकांची नजर चुकवून कंपाऊंडची ७ फुटाच्या भिंतीवरुन उडी मारुन आत प्रवेश करुन गळफास घेऊन आत्महत्या केली, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी खबरदारीची उपाय योजना म्हणून कंपनीच्या परिसराची स्वच्छता करण्याबाबत तसेच, अवैध व्यक्तींना प्रवेश मिळू नये व गैरकृत्य होऊ नये यासाठी कंपनीचे मुख्य प्रवेशव्दार तसेच मागिल भागात सुरक्षा रक्षक दिवसा व रात्री नेमले जावेत अशा खबदारीच्या सुचना सदर कंपनीचे व्यवस्थापक/मॅनेजर यांना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईमध्ये नाईट लाईफ सुरु करण्याचा घेतलेला निर्णय

**(२०) * २४७८ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये नाईट लाईफ संकल्पना दिनांक २६ जानेवारी, २०२० पासून राबविण्यात येणार असून त्यानुसार मुंबईत केमिस्ट, दवाखाने यासह हॉटेल्स, मॉल, दुकाने २४ तास सुरू ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयामुळे पोलीस, वाहतूक पोलीस यांसह अनेक यंत्रणांवर कामाचा ताण वाढून त्याचा परिणाम मुंबईतील कायदा आणि सुवव्यस्थेवर पडण्याची शक्यता असून दिवसाप्रमाणेच पोलिसांना रात्रीही मनुष्यबळ कार्यरत ठेवावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई पोलीस दलात सद्यस्थितीत उपलब्ध मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर कमतरता असल्याने सदरहू निर्णयामुळे पोलिसांवर येणाऱ्या अतिरिक्त ताणाचा शासनाकडून आढावा घेण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदरहू आढाव्यात काय आढळून आले आणि सदरहू निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबई शहरातील ठराविक ठिकाणी (Gated Establishment) २४/७ मुंबईची संकल्पना राबविण्यात येत असून, सदरची संकल्पना राबविताना स्थानिक पोलीस ठाण्याकडून त्यांच्या स्तरावर उपाययोजना करण्यात येत आहे.

(३) सदर प्रकरणी शासनाकडून आढावा घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयात समृध्दी महामार्गाच्या कंत्राटदारांनी अवैध उत्खनन केल्याबाबत

**(२१) * ६७०२ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृध्दी महामार्गाचे मुख्य कंत्राटदार ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर व उपकंत्राटदार एमपी कन्स्ट्रक्शन यांनी वर्धा जिल्हयात मोठया प्रमाणावर अवैधरित्या मुरुम व मातीचे उत्खनन केले असुन केळझर परिसरातील कोझी प्रॉपर्टीजच्या १०३ एकरातील मुरुम व माती चोरुन नेल्याप्रकरणी सेलू पोलिसात तक्रार दाखल केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲफकॉन्स इन्फास्ट्रक्चर व उपकन्स्ट्रक्शन या दोन्ही कंत्राटदारांनी शेतकरी व प्रशासनाच्या परवागनीशिवाय अवैधरित्या अत्खनन केले असून शासकीय जमिनीसह सामान्य शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये परवागनी शिवाय मोठमोठे खड्डे करून उत्खनन केले असून त्याचा मोबदला शेतकऱ्यांना मिळणार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) मौजा केळझर, ता.सेलू, जि.वर्धा येथील मे.कोझी प्रॉपर्टीज प्रा.लि., या कंपनीच्या मालकीच्या जमिनीतून मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीने गौण खनिजाचे अवैध उत्खनन केल्याची तक्रार मे.कोझी प्रॉपर्टीज या कंपनीने दि.३०/७/२०१९ रोजी सेलू पोलीस ठाणे, जि.वर्धा येथे केली आहे.

(२) व (३) कंत्राटदार कंपनी व खाजगी शेत/जमीन मालक यांच्या आपसातील करारनाम्यानुसार परस्पर मोबदला देवाण घेवाण होवून गौण खनिज उत्खननाकरीता जमिनी भाडेतत्वावर देण्यात येतात. त्यामुळे शासनस्तरावरुन शेतकऱ्यांना मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मौजे केळझर येथील स.नं.६१२/१ क्षेत्र ५२.०३ हे.आर., स.नं.६१२/२ क्षेत्र ३३.८५ हे.आर., स.नं.६१३/१ क्षेत्र ४९.६२ हे.आर. व स.नं.६१३/२ क्षेत्र ६०.७८ हे.आर. आणि मौजे खापरी ढोणे येथील स.नं.३३ क्षेत्र ११.७४ हे.आर. व स.नं.३४ क्षेत्र १९.१० हे. आर. या जमिनीतून मुरुम व दगड या गौण खनिजाचे उत्खनन केल्याबाबत मे.ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीस

तहसिलदार, सेलू यांनी रु.२३८,९९,७२,१४८/- इतक्या दंडात्मक रक्कमेचे आदेश दि.१७/१२/२०१९ रोजी पारीत केले आहेत. उक्त आदेशाविरुध्द सदर कंपनीने मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.४१५/२०२० दाखल केली असून मा.उच्च न्यायालयाने दि.२१/१/२०२० रोजी पुढील आदेश होईपर्यंत तहसिलदार, सेलू यांच्या आदेशास स्थगिती दिली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१(फ) साठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(२२) * ७२६४ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरवंडी-ब्रम्हनाथ येळंब, आर्वी खालापुरी-नवगण राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ (फ) साठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे महामार्गाचे काम सुरु करण्यास संबंधित शेतकरी व ग्रामस्थांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या भूसंपादन कामासाठी केंद्र शासनाने एकूण ३२९ कोटी उपलब्ध करुन दिले असताना केवळ मोजणी भूसंपादन नियंत्रक अधिकारी यांच्या हलगर्जीपणामुळे मागील दोन वर्षांपासून संबंधित शेतकरी मोबदल्यापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित मोजणी भूसंपादन व नियंत्रक अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करण्याबाबत संबंधित शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली असून त्याबाबतची निवेदने जिल्हाधिकारी, बीड व विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे काम बंद पडल्यामुळे शासनाचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देऊन संबंधित भूसंपादन व नियंत्रक अधिकारी यांचेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) हे खरे नाही.

खरवंडी-ब्रम्हनाथ येळंब आर्वी, खालापुरी-नवगण राजुरी या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ (F) च्या रस्त्याकरीता जमीन संपादनाची व निवाडा घोषित करणेची कार्यवाही अद्याप चालू आहे. अंतिम निवाडा घोषित न झाल्यामुळे मोबदला देण्याचा प्रश्न सद्यस्थितीत येत नाही.

तसेच सद्यस्थितीमध्ये सदर महामार्गाचे काम सुरु करण्यासाठी संबधित शेतकऱ्यांचा कोणताही विरोध नाही.

(२) (अ) खरवंडी-ब्रम्हनाथ, येळंब-आर्वी, खालापुरी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१(फ) हा अहमदनगर व बीड जिल्हयातून जात आहे.सदर महामार्गासाठी अहमदनगर व बीड या दोन्ही जिल्हयांसाठी सक्षम प्राधिकारी हे केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडून दि.३०.१२.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये घोषित करण्यात आले आहेत. या महामार्गासाठी अहमदनगर जिल्हयातील ५ गावांचा तर बीड जिल्हयातील ८ गावांचा समावेश आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता,राष्ट्रीय महामार्ग विभाग,औरंगाबाद यांचे कार्यालयाकडून भूसंपादन प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहेत.प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने संयुक्त मोजणीची प्रक्रिया उपअधीक्षक,भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडून प्रगतीपथावर आहे.संयुक्त मोजणीची प्रक्रिया पूर्ण करून घेऊन राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ३(A) ची कार्यवाही चालू आहे.

(ब) सदर अधिनियमांतर्गत अंतिम निवाडा घोषित करून मावेजा वितरित करण्याची कार्यवाहीबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दक्षता घेण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी विलंब झाला नसल्याने संबंधित भूसंपादन अधिकारी यांचेविरुद्ध कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयात परप्रांतीय व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(२३) * ३६५९ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात परप्रांतीय व्यापाऱ्यांनी द्राक्षे,डाळिंब व कांदे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांनी विविध पोलीस स्टेशनमध्ये एकूण ५२ फसवणुकीचे गुन्हे दाखल करूनही अद्यापपर्यंत फसवणूक करणाऱ्या परप्रांतीय व्यापाऱ्यांवर कोणतीही कायदेशीर कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, फसवणूक करणाऱ्या परप्रांतीय व्यापाऱ्यांवर अद्यापपर्यंत कारवाई न केल्यामुळे शेतकरी वर्गाने हतबल होवून आत्मदहन करण्याबाबतचे निवेदन शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, फसवणुकीला बळी पडलेल्या शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयात माहे जानेवारी, २०२० मध्ये परप्रांतीय व्यापा-यांनी द्राक्ष/डाळींब व कांदा उत्पादन करणा-या शेतक-यांची लाखो रुपयांची फसवणूक केलेबाबत गुन्हे दाखल नाहीत.

शेतक-यांचे फसवणुकीचे सन २०१७ मध्ये ५, २०१८ मध्ये १८ व सन २०१९ मध्ये ९ असे एकूण ३२ गुन्हे दाखल आहेत. सदर ३२ गुन्हयांपैकी १४ गुन्हयांचे दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे. उक्त गुन्हयात एकूण २१,९६,१३,६८३/- रुपयांची फसवणूक झाली असून हस्तगत रक्कम ३,३४,७०,६९७/- इतकी आहे. तसेच सन २०१८ मध्ये पुणे येथील डी.आर.टी. प्राधिकरणाने जिल्हाधिकारी, नाशिक यांना वसुलीचे आदेश दिले असून एकूण ३,२१,२७,८६६/- रुपयांची रक्कम हस्तगत होणार आहे. उक्त रक्कम हस्तगत झालेनंतर एकूण हस्तगत रक्कम ६,५५,९८,५६३/- होणार आहे.

(३) अशा स्वरुपाचे निवेदन गृह विभागामध्ये आढळून आलेले नाही.
(४) शेतकऱ्यांच्या फसवणुकीबाबत तक्रारी प्राप्त होताच तात्काळ गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्याची दक्षता ठेवली आहे.
(५) विलंब झाला नाही.

-----------------

## शासकीय जमिनीवर उभारण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या वर्गीकरणाबाबत

**(२४) * ६१३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय जमिनीवर उभारण्यात आलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे 'ब' वर्गातून 'अ' वर्गात वर्गीकरण करण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वर्गीकरण करण्याकरिता शासकीय रेडीरेकनर दरानुसार १० टक्के शुल्क लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शुल्क गृहनिर्माण संस्थाना परवडणारे नसल्यामुळे शुल्क कपात करुन १० टक्क्यावरुन १ टक्क्यावर आणण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) कृषिक किंवा निवासी किंवा वाणिज्यिक किंवा औद्योगिक प्रयोजनासाठी भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनी वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याकरिता शासनाने "महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२, आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरण करणे) नियम, २०१९" हे नियम दिनांक ०८.०३.२०१९ च्या शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहेत.

या नियमांमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या जमिनीच्या धारणाधिकाराच्या रुपांतरणाचा समावेश आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्टयाने अथवा कब्जेहक्काने प्रदान केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या भोगवटयात असलेल्या जमिनी, त्यांना वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करावयाच्या असल्यास, अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रातील दराप्रमाणे येणाऱ्या किंमतीच्या १५ टक्के एवढी अधिमूल्याची रक्कम आकारण्याची तरतुद आहे.

सदरहू १५ टक्के अधिमूल्याचे दर हे मुळातच सवलतीचे दर आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत हे दर कमी करण्याबाबत शासनाचा विचार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील भाभा अणुसंशोधन केंद्रामध्ये नोकरीचे आमिष दाखवून केलेली फसवणूक

**(२५) * १४०३ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील भाभा अणुसंशोधन केंद्रामध्ये नोकरीचे आमिष दाखवून महाराष्ट्र व कर्नाटक येथील तरुणांची तासगाव (जि.सांगली) येथील व्यक्तीने कोट्यवधी रुपयांनी फसवणूक केल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, लातूर व कर्नाटक येथील अनेक तरुणांची फसवणूक केली असून सदर प्रकरणी जुनाराजवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तक्रारदारांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी जुनाराजवाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७/२०२० भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा नौपाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०० ने वर्ग केला आहे.

अशाच स्वरुपाची बाब महात्मा फुले पोलीस ठाणे, कल्याण या ठिकाणी देखील घडल्याची बाब उघडकिस आल्याने महात्मा फुले पोलीस ठाणे, कल्याण येथे गु.र.क्र. ३९/२०२० भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४७१, ३४ अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्ह्यातील सराईत आरोपीतांना वेळीच अटक करण्यात आली असून आरोपीतांचे बँक खाते संरक्षित करण्यात आलेली आहेत. आरोपीतांनी सदर पैश्यातून कोणती जंगम मालमत्ता खरेदी केली वा कसे, याबाबत शोध घेवून ती जप्त करणेकामी अधिकचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकुंडी, कासलिंगवाडी (ता.जत, जि.सांगली) येथील रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२६) * ४९७६ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकुंडी (ता.जत, जि.सांगली) येथील शेततलाव योजनेत सुमारे २४.१९ लाख रुपयांचा तर कासलिंगवाडी येथे रोजगार हमी योजनेच्या कामात सुमारे १२.५६ लाखांचा गैरव्यवहार तालुका कृषी अधिकारी व इतर अधिकारी यांनी शेतकरी व ठेकेदार यांच्याशी संगनमत करून केल्याचे सन २०१७-२०१८ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाज येथील रोजगार हमी योजनेच्या कामात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असुन जिल्हाधिकारी, सांगली यांनी मनरेगा कक्षातील कंत्राटी कामगारांवर कारवाई करुन सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने तातडीने चौकशी करुन दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी म्हणून तेथील नागरिकांसह विविध संघटनांनी जिल्हा कृषी अधिकारी, सांगली, उपविभागीय कृषी अधिकारी, जत यांच्याकडे सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ मध्ये तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
सदर अनियमिततेच्या चौकशीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गठीत केलेल्या ५ सदस्यीय समितीच्या अहवालानुसार संबंधित दोषी कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. संबंधित दोषी अधिकारी / कर्मचारी / पदाधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बनावट नोटा चलनात आणणारे रॅकेट सक्रिय असल्याबाबत

**(२७) * ३४९१ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात नकली नोटा चलनात आणणाऱ्या टोळीस दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास पोलीसांनी पकडले असून पनवेलमध्येही बनावट नोटा छापण्याच्या कारखान्यावर अलिबाग पोलीसांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास छापा टाकला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईमध्ये नव्याने चलनात आलेल्या नोटांचीही बनावट छपाई केली जात असल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, सदर बनावट नोटा पाकिस्तानातून आणण्यात आल्याचे स्पष्ट झाले असून यामागे दहशतवादी संबंध तसेच भारतापासून दुबई ते पाकिस्तान अशी मोठी साखळी सक्रीय असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राज्यातील अनेक शहरांमध्ये मागील काही दिवसांत बनावट नोटा चलनात आणणारे मोठे रॅकेट कार्यरत असुन यातील बहुतांश बनावट नोटा या बांग्लादेश मार्गे भारतात येत असल्याचे प्राथमिक चौकशीतुन उघड झाले असुन राज्यात नकली चलन चलनात आणणाऱ्या बऱ्याच टोळ्या सक्रीय असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) होय.

अकोला जिल्ह्यात नकली नोटा चलनात आणणाऱ्या टोळीविरुध्द दिनांक २१ जानेवारी, २०२० रोजी पो.स्टे. डाबकी रोड, अकोला येथे अप. नं.०९/२२० कलम ४८९ (ब)(क) भादंवि नुसार गुन्हा नोंद करुन दिनांक २२/०१/२०२० रोजी टोळीतील पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पनवेल मध्येही स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग, अलिबाग-रायगड पथकाने मौजे अलिबाग, मेघा टॉकीज समोर, अलिबाग, जि.रायगड येथे दिनांक २७/१२/२०१९ रोजी छापा टाकण्याची कारवाई करुन गु.र. न.१७४/२०१९ भादंवि कलम ४८९(ब)(क) अन्वये त्याच दिवशी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यामध्ये दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(२) दिनांक ०९/०२/२०१९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, टर्मिनल-२ वर एका आरोपीची झडती घेतली असता त्याचे ताब्यात असलेल्या २००० रुपयाच्या ११९३ अशा एकूण २३,८६,००० रुपयाच्या बनावट चलनी नोटा मिळून आल्याने सहार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.४३/ २०२० कलम ४८९(ब) (क) १२० (ब), ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात येवून सदर गुन्हा गुन्हे प्रकटिकरण शाखा, कक्ष-८, गुन्हे अन्वेषण विभाग मुंबई यांचेकडे हस्तांतर करण्यात आला.

नमूद गुन्ह्यात अटक आरोपीकडील चौकशीत त्याने सरदार या पाहिजे आरोपी साथीदाराचे नाव निष्पन्न झाले असून सरदारने दुबई येथे त्याच्या हस्तकाकरवी बनावट नोटा असलेली बॅग त्याचे ताब्यात दिल्याचे सांगितले. तपसादरम्यान (NIA) च्या विनंतीवरुन मा. न्यायालायाच्या आदेशान्वये सदरचा गुन्हा राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) यांचेकडे पुढील तपासकामी वर्ग करण्यात आला आहे.सध्या गुन्ह्याचा पुढील तपास NIA करीत आहे.

(३) सन २०१९ मध्ये राज्यात भारतीय बनावट नोटासंदर्भात एकूण ६५ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये एकूण ६६ आरोपीतांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु.१,९८,५१,८००/-किंमतीच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

सन २०२० मध्ये अद्यापपर्यंत ४ गुन्हे दाखल आहेत. त्यामध्ये एकूण ९ आरोपीतांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु.३,००१००/- किंमतीच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

नमूद गुन्ह्याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी बनावट नोटा बांगलादेश मार्गे भारतात येत असल्याचे दिसून येत नाही. तसेच गुन्ह्यांचे अवलोकन केले असता लहान टोळ्या सक्रीय असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

(४) उपरोक्त उपप्रश्न क्र.१, २ व ३ मधील गुन्हे दाखल असून सदरचे गुन्हे तपसाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# वसई (जि.पालघर) तालुक्यातील केळी पिकाला बुरशीजन्य रोगाची लागण झाल्याबाबत

**(२८) * ६१३९ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील प्रसिध्द केळी पिकाला बुरशीजन्य रोगाची लागण झाल्यामुळे केळी बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे स्थानिक बागायतदार चिंताग्रस्त होवुन आर्थिक संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत पाहणी शासनाने केली आहे काय,

(४) असल्यास, नुकसानग्रस्त केळी बागायतदारांना तातडीने मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

वसई तालुक्यामध्ये अर्नाळा, वासळाई, वटार, कौलार खु.कैलार बु., गास,सत्पाळा या गावांमध्ये ८ ते ९ हेक्टर क्षेत्रावर अल्पशः प्रमाणात बुरशीजन्य रोगाची लागण झाली असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) हे खरे नाही

(३) होय. कृषि विदयापीठाचे शास्त्रज्ञ, तालुका कृषि अधिकारी व कर्मचारी यांनी गावांमध्ये भेट दिली व प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली आहे.

(४) प्रादुर्भावग्रस्त झाडावर फक्त पाणी अथवा १ टक्के स्टार्च (१० ग्रॅम/लि.पाणी) या प्रमाणात फवारणी करणे, पिवळया रंगाचा चिकट सापळयाचा उपयोग करणे व प्रादुर्भाव जास्त असल्यास ५ टक्के निंबोळी तेलाची फवारणी करणे इ. उपाययोजना अंवलंबण्याबाबत सांगण्यात आले. वृत्तपत्रांमधून प्रचार व प्रसिद्धी करण्यात आलेली आहे. कृषि सहाय्यकांमार्फत उपाययोजनेबाबत संदेश दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) तालुक्यात जप्त करुन ठेवलेल्या रेतीसाठयाबाबत

**(२९) * ६८३२ श्री.बालाजी कल्याणकर (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यातील आठ रेती घाटापैकी एकाही रेती घाटाचा लिलाव झालेला नसतांना महसूल प्रशासनाच्या व रेती तस्कारांच्या संगनमताने नेर, लिंबायत, टाकळी व इतर अनेक ठिकाणी दिनांक १० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास जप्त करुन ठेवलेला एकूण २४५ ब्रास रेती साठा गायब झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) माहूर येथील २७३ ब्रास, मौजे मुरली येथील ७ ब्रास व मौजे लिंबायत येथील ५० ब्रास असा एकूण ३३० ब्रास जप्त करण्यात आलेला वाळूसाठा माहूर नगर पंचायत अंतर्गत घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेला आहे.

(२) व (३) या प्रकरणी स्थानिक नागरिकाने मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार केली असून सदर तक्रार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे चौकशीकरिता पाठविण्यात आली आहे. चौकशीअंती उचित कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिघी बंदरात नवीन जेटी उभारण्यास निधी मिळण्याबाबत

**(३०) * २४२९ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील दिघी बंदरातील जीर्ण अवस्थेत असलेल्या जेट्टीमुळे मासे उतरण्यासाठी जागा नसल्यामुळे मासे खराब होवून कमी भावाने विकावे लागत असल्याने मच्छीमारांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेट्टीअभावी डिझेल व बर्फ चढविताना मच्छीमारांना त्रास होत असुन उक्त बंदरात नवीन जेट्टी मंजूर होवूनही निधी अभावी जेटीच्या कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रीवर्धन तालुक्यातील दिघी बंदर विकासापासून वंचित राहु नये म्हणून नवीन जेटी उभारण्यास तातडीने निधी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख :** (१) हे खरे नाही.

(२) दिघी बंदरामध्ये जेट्टी बांधकामाच्या कामास दि.०४.०१.२०२० रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र सागरी तटीय नियमन क्षेत्र प्राधिकरणाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होताच काम सुरु करण्यात येणार आहे.

(३) सदर कामाकरिता सन २०१९-२० मध्ये ३.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केला असून, आगामी सन २०२०-२०२१ साठी ११.४० कोटी इतक्या निधी मागणी केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगांव-भिमा (जि.पुणे) येथे दोन गटाच्या वादामध्ये झालेल्या हिंसाचाराबाबत

**(३१) * ४०० श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव-भिमा (जि.पुणे) येथे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास दोन गटात झालेल्या वादानंतर उफाळलेल्या हिंसाचाराच्या घटनेला अगोदरच्या दिवशी पुण्यातील शनिवार वाड्यात पार पडलेली एल्गार परिषदच कारणीभूत असल्याची तक्रार फरासखाना पोलीस ठाण्यात करण्यात आल्यानंतर पुणे पोलीसांनी राजकीय आकसातून कारवाया केल्याचा आरोप करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी पुणे पोलीसांचा तपास संशयास्पद असल्याने राज्याचे गृहमंत्री यांनी या हिंसाचार प्रकरणी गैरजबाबदार वागणूक व सामाजिक कार्यकर्ते, लेखक, कवी यांच्या घरावर छापे टाकण्याची कारवाई करणाऱ्या पोलीसांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) (i) एल्गार परिषद व भिमा-कोरेगांव या दोन घटना अलग आहेत.

(ii) राजकिय आकसातून कारवाया झाल्या असे अनेक निवेदने शासनाला मिळाले आहे.

(२) व (३) वरील विषय शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## ठाणे महानगरपालिका हद्दीतील बाळकूम भागातील अनधिकृत बांधकामाबाबत

**(३२) * २१०५ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका हद्दीतील बाळकूम भागातील खारफुटी लगत असलेल्या शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून उभारण्यात आलेली सुमारे १८५ बांधकामे ठाणे महसूल विभागाने जमीनदोस्त करून अनेक नागरिकांना बेघर केल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व बेघर झालेल्या नागरिकांच्या निवासाबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) (२) व (३) मौजे बाळकूम, ता.जि.ठाणे येथील स.नं. १८१ क्षेत्र ०-८१.० हे-आर या शासकीय जमिनीवरील सुमारे १५० पत्र्याची कच्ची व सुमारे ३५ पक्क्या स्वरुपाची अतिक्रमणे ठाणे महानगरपालिकेकडील अतिक्रमण विभाग व क्षेत्रीय महसूल यंत्रणेमार्फत संयुक्तपणे दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजी निष्कासित करण्यात आली आहेत. सदरची अनधिकृत अतिक्रमणे शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पुनर्वसनास पात्र नसल्याने अतिक्रमणधारकांचे निवासाबाबत पुनर्वसन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर येथील नियोजित चिंचोळी औद्योगिक वसाहतीमध्ये स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत

**(३३) * ६९७३ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील चिंचोळी एमआयडीसी मधील उद्योगांची व्याप्ती वाढत असल्यामुळे उद्योजकांना चोरी, अतिक्रमण इत्यादी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहतीमध्ये स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना वारंवार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून चिंचोळी एमआयडीसी मधील चोरी व अतिक्रमणाच्या वाढत्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१), (२) व (३) मोहोळ पोलीस ठाणे व सोलापूर तालुका पोलीस ठाणेचे विभाजन करून चिंचोली औद्योगीक वसाहतीमध्ये नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतच्या पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार उचित निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात तलाठी भरती प्रक्रियेत झालेला गैरप्रकार

**(३४) * ५९४६ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तलाठी पदांच्या भरती प्रक्रियेत काही उमेदवारांनी नियमबाह्य पध्दतीने एकापेक्षा अधिक वेळा विविध जिल्हयातून तलाठी भरतीची ऑनलाईन परिक्षा दिल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी काहींची नावे जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रकाशित केलेल्या तलाठी पदाच्या शिफारस यादीत प्रसिध्द झाली असल्याने तलाठी भरतीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याची तक्रार उमेदवारांनी पुराव्यानिशी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठी भरतीवर शासनाने तात्काळ स्थगिती आणावी अशी विनंती उमेदवारांकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गैरप्रकार करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) राज्यातील तलाठी पदाच्या भरती प्रक्रियेत औरंगाबाद विभागात दोन उमेदवारांनी एका पेक्षा जास्त (दोन) जिल्ह्यातून ऑनलाईन परीक्षा दिल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) ज्या उमेदवाराने एका पदाकरीता दोन जिल्ह्यांमध्ये परीक्षा दिलेल्या आहेत अशा उमेदवारांची, उमेदवारी रद्द करुन पुढील निवड प्रक्रिया करण्याबाबत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या कार्यालयास आक्षेप अर्ज प्राप्त झालेला आहे.
(३) नाही.
(४) व (५) तलाठी पद भरतीसंदर्भात जिल्हा प्रशासनास प्राप्त झालेल्या तक्रारींची शाहनिशा करुन त्यावर नियमोचित कार्यवाही करणे तसेच परीक्षेचा निकाल जाहीर करण्यास संबंधित जिल्ह्याची "जिल्हा निवड समिती" सक्षम प्राधिकारी आहे. करीता शासनाने पदभरतीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/परिपत्रकांमधील सूचना लक्षात घेवून नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांना कळविण्यात आलेले आहे.

-----------------

## शिर्डी येथील साईबाबा देवस्थानातून अनेक नागरिक बेपत्ता झाल्याबाबत

**(३५) * ३७३१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१७-१८ मध्ये शिर्डी येथील साईबाबा देवस्थानातून ९० नागरिक बेपत्ता झाल्याची तक्रार शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल होऊनही अद्याप यापैकी एकाही घटनेचा तपास पोलीसांना लागला नसल्याचे दिनांक १५ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास माहिती अधिकारातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंदोर येथील साईभक्त मनोजकुमार सोनी हे २०१७ मध्ये आपल्या पत्नी बरोबर साईबाबांच्या दर्शनासाठी गेले असता त्यांची पत्नी शिर्डीतून बेपत्ता झाल्याची तक्रार शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल करुनही अद्याप यावर पोलीसांकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शिर्डी पोलीस ठाण्यात बेपत्ता झालेल्या ९० भाविकांच्या प्रकरणांचा तपास उच्च स्तरावरुन करण्यात येऊन यातील दोषी विरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच भारतातून दरवर्षी लाखो भाविक शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी येत असल्याने भक्तांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) शिर्डी पोलीस स्टेशन येथे सन २०१७ मध्ये एकूण ७१ इसम बेपत्ता झाले असून त्यापैकी ५२ बेपत्ता इसमांचा शोध लागला आहे.

तसेच, सन २०१८ मध्ये एकूण ८२ इसम बेपत्ता झाले असून त्यापैकी ६४ बेपत्ता इसमांचा शोध लागला आहे.

तसेच, सन २०१९ मध्ये एकूण ८८ इसम बेपत्ता झाले असून त्यापैकी एकूण ७४ बेपत्ता इसमांचा शोध लागला आहे. उर्वरीत बेपत्ता इसमांचा शोधही कसोशीने सुरु आहे.

(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन शिर्डी येथे मिसींग रजिस्टर नं.३९/२०१७ दाखल आहे. उक्त महिलेचा शोध घेण्यासाठी मानवी व्यापार प्रतिबंधक विभाग, अहमदनगर यांच्या स्वतंत्र पथकामार्फत तसेच, पोलीस स्टेशन स्तरावर स्वतंत्र पथकामार्फत शोध घेण्यात आला आहे.

जिल्ह्यात विविध ठिकाणी बेपत्ता महिलेचे फोटो प्रदर्शित केले आहेत. तसेच, विविध ठिकाणांतील सी.सी.टी.व्ही. कॅमरे चेकिंग करुन शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मिसींग महिलेच्या वापरातील मोबाईलचे सीडीआर, एसडीआर ची माहिती संकलीत करुन महिलेचा शोध कसोशीने सुरु आहे.

(३) शिर्डी येथील भाविकांच्या सुरक्षेकरिता पुढील उपाय योजना केल्या आहेत-

शिर्डीत ठिकठिकाणी विविध राज्यातील प्रादेशिक भाषेत माहिती केंद्रे स्थापन केलेली आहेत, ठिकठिकाणी दुभाषीकांची नेमणुक करण्यात आली आहे. विविध ठिकाणी पोलीस स्टेशन फोन नं. व मदत केंद्राचा नं. दर्शवणारे बोर्ड लावण्यात आले आहेत, मंदिरपरिसरात मिसींग सेल स्थापन करण्यात आले आहेत, विविध महत्वाच्या ठिकाणी १४९ सी.सी.टी.व्ही. कॅमरे लावण्यात आले आहेत, पोलीस स्तरावर महिला सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे, तसेच जिल्हा पोलीस दलामार्फत १०० नंबर दुरध्वनीवर संपर्क करुन मदतीकरीता सुविधा उपल्ब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील मुळा, प्रवरा व गोदावरी नदीपात्रातून होत असलेल्या अवैध वाळू तस्करीबाबत

**(३६) * ४०६३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील मुळा, प्रवरा व गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू तस्करी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयात शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांनी प्राणघातक हल्ले केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर हल्ले करणाऱ्यांवर व या नदीपात्रात अवैध वाळू उपसा होऊ नये याबाबत शासनाने कोणत्या प्रतिबंधक उपाययोजना केल्या आहेत व नदीपात्रात उत्खनन करणाऱ्या किती वाहनावर माहे जानेवारी ते डिसेंबर, २०१९ अखेर शासनाने कारवाई केली आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) अहमदनगर जिल्हयातील मुळा, प्रवरा व गोदावरी नदीपात्रातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करतांना महसूल अधिकारी/कर्मचारी यांचेवर सन २०१९-२०२० मध्ये ३ हल्ले झाल्याची ही बाब खरी आहे.

अहमदनगर जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१९ ते जानेवारी, २०२० या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ४४५ प्रकरणी रु.५,५५,८१,६६६/- इतका दंड आकारण्यात आला असून त्यापैकी रु.२,१९,१२,०१४/- इतकी दंडात्मक रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. तर ९० प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच (एम.पी.डी.ए.) महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन व्यक्ती (व्हिडिओ पायरेट) या घातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम, १९८१ अंतर्गत ४ आरोपींना स्थानबध्द करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) लोह प्रकल्पास सुरक्षा व्यवस्था पुरविण्याबाबत

**(३७) * ३३३८ डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथे सन २००७ पासून लोह प्रकल्पाच्या उत्खननाचे काम सुरू होते, परंतु जाळपोळीच्या घटनेनंतर पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांनी या प्रकल्पास सुरक्षा व्यवस्था पुरविण्यास नकार दिल्याने हा प्रकल्प दिनांक १६ जानेवारी, २०१९ पासून बंद स्थितीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्खननाचे काम सुरक्षेअभावी बंद असल्यामुळे जिल्ह्यातील हजारो स्थानिक लोकांचा रोजगार बंद झाला असून जिल्ह्यातीलच नव्हे तर विदर्भातील लाखो लोकांना या प्रकल्पातून रोजगार मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प तातडीने सुरू करून प्रकल्पास सुरक्षा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) सुरजागड प्रकल्पाच्या रोडवरील गुरुपल्लीकरेम फाट्याजवळ एस.टी.बस व ट्रक मध्ये झालेल्या अपघातामध्ये चार व्यक्ती मरण पावल्याच्या घटनेनंतर तेथील जमावाने सोळा ट्रकची जाळपोळ करुन सुरजागड लोहप्रकल्प बंद करण्याचे आंदोलन केले होते. त्यानंतर दि. ४/३/२०१९, ६/३/२०१९, १२/३/२०१९, १४/३/१९ पर्यंत प्रकल्पाचे काम सुरु होते.
(३) व (४) सदर प्रकल्प तातडीने पुन्हा कसा सुरु करता येईल, याबाबत शासन स्तरावर विचार चालू आहे.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधील भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(३८) * ७४०६ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार करुन शासनाची फसवणूक करुन नोकर भरती करणारे एक राज्यभर पसरलेले रॅकेट अस्तित्वात असून आतापर्यंत राज्यभरात यासंदर्भात २८ गुन्हे नोंदविण्यात आले असून २०० जणांना अटक करण्यात आली आहे तसेच याद्वारे सुमारे १ हजारपेक्षा अधिक अधिकारी/कर्मचारी शासन सेवेत कार्यरत झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात राज्यात मांडवी पोलीस स्टेशन, ता.किनवट (जि.नांदेड), वडगाव पोलीस स्टेशन (जि.यवतमाळ), हिंगोली शहर पोलीस

स्टेशन (जि.हिंगोली), डेक्कन पोलीस स्टेशन (जि.पुणे), इस्लामपूर पोलीस स्टेशन (जि.सांगली), शिवाजीनगर पोलीस स्टेशन (जि.पुणे), सातारा शहर पोलीस स्टेशन (जि.सातारा), शाहुपुरी पोलीस स्टेशन (जि.कोल्हापूर), शिवाजीनगर पोलीस स्टेशन (जि.नांदेड) तसेच भायखळा पोलीस स्टेशन, मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशन, शिवाजी पार्क पोलीस स्टेशन व माटुंगा पोलीस स्टेशन (जि.मुंबई) इत्यादी ठिकाणी गुन्हे दाखल आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांकडून पुरावे नष्ट करण्याचे काम केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एकमेकांशी संबंधित असणाऱ्या राज्यभरातील या सर्व गुन्ह्यांचा एकाच पथकामार्फत तपास करण्यात येणार आहे काय, तसेच या सर्व व्यापक प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये गैरप्रकार केलेबाबत एकूण ९ गुन्हे दाखल आहेत.

उक्त गुन्ह्यांपैकी खालील ५ गुन्ह्यांचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागा मार्फत करण्यात येत आहे.

I) मांडवी, पोलीस स्टेशन गु.र.नं.२७/२०१६

II) वडगाव, पोलीस स्टेशन गु.र.नं.४३१/२०१६

III) हिंगोली शहर, पोलीस स्टेशन गु.र.नं.३२६/२०१८

IV) डेक्कन, पोलीस स्टेशन गु.र.नं.८९/२०१८

V) शिवाजीनगर, पोलीस स्टेशन गु.र.नं.१५२/२०१९

उपरोक्त ५ गुन्ह्यांमध्ये एकूण ४५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

राज्यात इतरत्र दाखल खालील ४ गुन्ह्यांचा तपास स्थानिक पातळीवर करण्यात येते आहे.

VI) सातारा शहर, पोलीस स्टेशन गु.र.नं.२६०/२०१८

VII) शाहुपुरी, पोलीस स्टेशन गु.र.नं.११२/२०१९

VIII) तालुका जालना, पोलीस स्टेशन गु.र.नं.३५८/२०१६

IX) इस्लामपूर, पोलीस स्टेशन गु.र.नं.२५८/२०१९

उपरोक्त ४ गुन्ह्यांमध्ये एकूण १५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(३) गुन्ह्याच्या तपासामध्ये सदरची बाब निष्पन्न झालेली नाही.
(४) तसा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(५) विलंब झाला नाही.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) येथील दत्त मंदिर संस्थांनाच्या जमिनीतुन गौण खनिज (मुरुम) उत्खनन केल्याबाबत

**(३९) * ४९९३ श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजयदिप कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा.लि.मुंबई यांना जिल्हाधिकारी यांनी रस्त्याच्या कामासाठी रेणापूर (जि.लातूर) येथील दत्त मंदिर संस्थांन मालकीच्या जमिनीतील दोन हजार ब्रास गौण खनिज (मुरुम) उत्खनन करण्याची परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीने तेथील ९२६ गटामधील हजारो ब्रास मुरुमाचे उत्खनन करुन शासनाचे लाखो रुपयांच्या महसुलाचे नुकसान केल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी महसूल विभागातील अधिकारी यांच्या संगनमताने लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याने तातडीने चौकशी करुन कंपनी आणि महसूल विभागातील अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक व सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधित कंपनीवर आणि त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मंजूरीपेक्षा अधिक मुरुमाचे उत्खनन केले असल्याबाबत जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे दि.१४/१/२०२० रोजी तक्रार प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, रेणापूर यांनी त्यांच्या दि.३१/१/२०२० रोजीच्या पत्रान्वये उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, रेणापूर यांना सदर जमिनीत झालेल्या उत्खननाची E.T.S. मोजणी करण्याबाबत कळविले आहे. E.T.S. मोजणी अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील क्रीडा संकुलांची कामे निधी अभावी अपूर्ण असल्याबाबत

**(४०) * ४४१८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील एकूण १५ तालुक्यांपैकी फक्त सहाच तालुक्यात असलेल्या क्रीडा संकुलांची कामे निधी अभावी अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील पेण, पनवेल, सुधागड, रोहा, माणगाव व तळा येथील क्रीडा संकुलाची निगा राखण्यासाठी व दुरुस्तीसाठी सुमारे १ कोटी रूपयांच्या निधीची गरज असताना केवळ ५ क्रीडा संकुलनासाठी सुमारे १५ लाख ८४ हजार रूपयांच्या निधीची तरतुद केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी अभावी अपूर्ण अवस्थेत असलेल्या क्रीडा संकुलनामुळे क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून खेळाडूंना वाव देण्याच्या दृष्टीने उत्तम सेवा देण्यासह क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरूस्तीसाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार :** (१) हे खरे नाही.

रायगड जिल्हयातील ५ क्रीडा संकुलांचे काम पूर्ण झाले असून,१ तालुका क्रीडा संकूलाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(२) हे खरे नाही

(३) हे खरे नाही

(४) रायगड जिल्हयातील विविध तालुका क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरुस्तीसाठी सन-२०१९-२०मध्ये एकुण १५.८४४ लक्ष इतका निधी वितरीत केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.